**<u>सेशन केस नं. ३३/१५</u>**
**<u>सा.क्र.४ निशाण क्र. ५२</u>**

**सरकारपक्षा तर्फे साक्षीदार क्र. ४ ची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,
माझे नांव :— राजेश वडिलांचे नांव :— दिपक कामतेकर,
वय सुमारे :— ३५ वर्षे व्यवसाय :— हॉटेल व्यवसाय,
रहाणार:— एस.टी.स्टॅन्ड, मालवण, तालुका :— मालवण,
जिल्हा:— सिंधुदुर्ग.

........................

<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता श्री.तोडकरी</u>

२८/११/२०१४ रोजी मी ग्रामीण रूग्णालय मालवणचे पाठीमागे संध्याकाळी ४.०० वाजता व्यायामासाठी गेलो होतो. संध्याकाळी पावणे सहा वाजता मालवण टॉकीज जवळून मी माझे प्लेजर गाडीने घरी चाललो होतो. मी भरड नाक्यापर्यंत गेलो. तिथे ट्रॅफिक असल्यामुळे मी माझी गाडी हळू केली. त्यावेळी राजेश पारकर, गिरीश पेडणेकर आणि साईनाथ पारकर हे पाठीमागून आले आणि राजेश पारकर याने माझ्या तोंडावर ठोसा मारला. त्याने माझ्या गाडीवर देखील लाथ मारली. त्यामुळे मी खाली पडलो. त्यानंतर तिन्हीही आरोपींनी मला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. श्री. ननो गिरकर वडापाववाला यांनी माझी त्यांच्यापासून सुटका केली. त्यांनी मला सायकल स्टोअर्सच्या मागे नेले. त्यानंतर मी वडीलांना फोन केला. त्यानंतर माझे वडील आणि नातेवाईक बाळू कांदळकर घटनास्थळी लगेच आले. वडिल आल्यानंतर ते म्हणाले तुला का मारले असे राजेश पारकरला विचारायला जावू या. म्हणून आम्ही बाजारपेठ मार्गे राजेश पारकरला मारण्याबद्दल विचारायला निघालो. मी झाटये हॉस्पीटलपर्यंत पोहोचलो होतो. मला झाटये हॉस्पीटलजवळ लोकांची गर्दी दिसली. आम्ही गाडी थांबविली आणि काय घडले ते पाहिले. आम्ही पाहिले की, राजेश पारकर, साईनाथ पारकर, गिरीश पेडणेकर, रमेश पारकर आणि रणजित पारकर हे ट्रॅफिक पोलीस धुरी यांना मारहाण करीत होते. रणजित पारकर आणि रमेश पारकर यांनी धुरी पोलिसांच्या गळयाला धरून भिलवडकरांच्या घरापर्यंत ओढत नेले. तेवढयात पोलीस तेथे आहे. ही घटना साधारण संध्याकाळी ६.०० ते ६.१० या दरम्यान घडली.

पोलीस आल्यावर गर्दीचा फायदा घेवून आरोपी तिथून पळाले. त्यावेळेस कॉन्स्टेबल धुरी ट्रॅफिक युनिफॉममध्ये होते. पोलीसांनी माझा जबाब घेतलेला आहे.

२. मालवण न्यायालयात सुध्दा माझा फौ.प्र.संहिता कलम १६४ नुसार जबाब झालेला आहे. मला आता फौ.प्र.संहिता कलम १६४ नुसार नोंदविलेला माझा जबाब दाखविला (न्यायालयात आज रोजी सीलबंद पाकीट उघडण्यात आले.) तो तोच आहे, मजकूर खरा व बरोबर आहे, त्यावर माझी व संबंधित प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांची सही आहे, त्यास **नि.क्र.५३** देण्यात येते. मला आरोपींना दाखविल्यास मी ओळखू शकतो. आरोपी रणजित पारकर सोडून इतर सर्व आरोपी हजर आहेत.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास आरोपी क्र.१, ४ चव ५ तर्फे वकील श्री.एस.डी.देसाई</u>**

नि.क्र.५४ वरील आदेशान्वये उलटतपास पुढील तारीखपर्यंत तहकूब.

श्रवणोत्तर स्विकृत

स्वाक्षरी/—

दिनांक—१२/०७/२०२२

(श्रीमती सानिका एस. जोशी)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
सिंधुदुर्ग—ओरोस.